Review Of Research
Vol. 3 | Issue. 6 | March. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# नाणी एक प्रतिकात्मक संकेत

**डॉ. उज्ज्वला दा. लोणकर**
शारदाबाई पवार महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय,शारदानगर.तालुका: बारामती. जिल्हा : पुणे.

**प्रस्तावना :**

आज विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या शोधामुळे जग गतिमान झाले आहे. जागतिकीकरण, उदारीकरण, आधुकीकरण, औद्यागिकरण, खाजगीकरण, पाश्चातीकरण,शहरीकरण अशा आधुनिक कारणांमध्ये आपण गुरफटून गेलो आहोत. त्यामुळे मागं वळून पाहयला वेळ मिळत नाही. पण आपला भूतकाळ खपु मनोरंजक आहे. आज सर्व सुखसोयी हात जोडून त्यामुळे आपले कोठेच काही आडत नाही. अचानक प्रवासाला निघायचे आहे.बॅकूतून पैसे काढायला वेळ नाही.तरी ही आपले काही आडत नाही. क्रेडित कार्ड, प्रवासी चेक, एटीएम् कार्ड वगैरे सर्व सोयी आपल्या सेवेस हजर,त्यामुळे आपण आनंदी.

पण पूर्वी या सोयी नव्हत्या. बॅका नव्हत्या,कपाटे नव्हती, इतकेच काय पण नाणीच नव्हती. तेंव्हा लोक काय करत असतील ? असा प्रश्न आपल्या पडतो.नाण्यांची साधरण सुरूवात केंव्हा झाली. ती कोणी केली? कोणकोणती नाणी काढली? हा सर्व इतिहास रंजक आहे.

माणूस आपली जंगली अवस्था सोडून हळूहळू शेती करू लागला. त्यावेळी आपल्या गरजा भागविण्यासाठी आपआपसात देवाणघेवाण करू लागला. एका वस्तुच्या बदल्यात दुसरी वस्तु असा व्यवहार सुरू झाला. अशा व्यवहारास 'बार्टर सिस्टिम' म्हटले जाते.

पूर्वी घराच्या मोठया रूंद भिंतीत,जमिनीत,तळघरात धन,जडजवाहिर ठेवले जात असत.कधी कधी अंगणत ,झाडाखाली उकरून पुरून ते ठेवले जात असत.शत्रूचे अचानक आक्रमण झाल्यास,स्वत:चा जीव वाचविण्यासाठी गावे सोडून निघून जावे लागत असे.पुन्हा परत आले तर ते धन मिळत असे.कधी कधी गावे तशीच ओस पडून राहत असत.कालांतराने तेथील ते धन कोणाला तरी मिळत असे. शेतात नांगरतानाही गुप्त धन सापडत असे.शिवाजी महाराजांना किल्यावर असा मोरिंचा हंडा सापडल्याचे आपण पुस्तकात वाचतो.

इ.स.पूर्व सुमारे ६२५ मध्ये लिडिया म्हणजेच तुर्कस्तान येथे सिंहाचे मुख असलेले नाणे होते. पाणिनीच्या म्हणजेच व्याकरणाच्या अष्टाध्यायातील उल्लेखाच्या आधारे हिंदुस्तानात प्रथम नाण्याचा श्शोध लागला असावा.अभ्यासुनी हा काळ साधारण इ.स.पूर्व ५०० ते६०० सांगितला आाहे. तेंव्हस नाणे युगाची सुरूवात हिंदुस्तानात झाली असावी. नाण्यांचा श्शोध लावण्याचा आणि त्याचा चलनासाठी वापर करण्याचा मान भारत व चीन या प्राचीन महा सत्तांकडे जातो.

Review Of Research
Vol. 3 | Issue. 6 | March. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X Available online at www.lbp.world

**काळी नाणी बनविण्याची पध्दती :**

फार पूर्वी धातू वितळवून श्शुध्द करून घेत व नंतर त्याचे मोठे तुकडे कापले जात.त्यावर विशिष्ट चिन्हे,प्रतिके यांचा पंचमार्क करीत ठसा उमटवीत. म्हणून पंचमार्क नावाने ओळखली जात.या नाण्यांचा वापर सर्वत्र होत असे. टिपू सुलनानने नाणी पाडण्यासाठी फ्रेंचची मदत घेतली होती.कणिष्क, कुषाण राजवटीतील नाण्यांचे वैशिष्टय म्हणजे नदीच्या पात्रातील माती नाणी पाडण्यासाठी वापरत.

इसवी सन पूर्व ६०० ते ७०० च्या सुमारास विविध राजवंश घराणी उदयास आली. तेंव्हा त्या त्या राजांनी आपली स्वतंत्र ठसा असलेली नाणी काढली. यात कौशल,आयोध्या,औदुबर,कासंबी,मगध, पांचाल, उज्जैन,कालिंघ काशी इ. राजघराण्यांनी आपापली नाणी अस्तित्वात आणली.या नाण्यांवरील चित्रे,लिखाण, त्यातील बदल यांचा अभ्यास करून त्या काळच्या राजेमहाराजांचा अनुभव काळ कळत असे. या नाण्यांवर सालही आढळत असे.नाण्यांवरील चित्रे , कला, चिन्हांवरून प्राचीन हिंदू संस्कृतीचा परिचय होतो.

**नाण्यांचा इतिहास :**

नाण्यांचा इतिहास खुप मोठा आहे.प्राचीन काळ ते ब्रिटिश काळ या काळात अनेक राजघराण्यांची नाणी पाहावयास मिळतात. राजस्थानमधील भरतपूरच्या किल्ल्यात २००० वर्षांपूर्वीची जुनी नाणी सापडली आहेत. तुघलक, सय्यद, सुरी, खिलजी, लोधी यासर्व घराण्यांची ५० अप्रकाशित दुर्मिळ नाणी आहेत.

अकबर बरदशहाने तांब्याची सर्वधिक नाणी काढली. त्याच्या ८५ टांकसाळी होत्या. बहुसंख्य प्रजा हिंदु आहे. हे लक्षात घेऊन त्यांने रामसीतेचे चित्र असलेले नाणे काढलेले होते.तसेच चांदीच्या नाण्यावर पर्शियन भाषेत राम हा शब्द कोरलेला होता.अकबर निसर्ग प्रेमी होते.त्याचेच प्रतिबिंब त्यांनी काढलेल्या नाण्यांवर आहे. तसेच इलाही म्हणजेच १२ महिन्यांची नाणी ही त्यांनी काढली होती.

अकबराप्रमाणेच शहजहान यांची ही नाणी इसवी सन १५५६ ते १६५८ च्या कालावधीतील आहेत. मुघलांच्या नाण्यांवर अलंकारीक नक्षी असे. मुस्लिम राजकर्त्यांनी पाडलेल्या नाण्यांवर चिन्हे नसत, कलम असत. पक्षी, प्राणी, फुले, वृक्ष असत. बहामनी सुलतानांनी ही आपली नाणी काढली होती. या वर्स नाण्यांचे बारकाईने निरिक्षण केले तर एक गोष्ट लक्षात येते की, नाण्यांवरील चित्रांवरून निधर्मी राज्याचे चित्र दिसते. औरंगजेबानंतर पुढील राजांनी फारशी नाणी काढली नाहीत. कच्छ मध्ये आठव्या एडवर्डच्या नावाचे नाणे आहे.

प्राचीन काळातील अनेक राजांच्या मूर्ती आढळत नाहीत. ते कसे दिसत असावेत. असा प्रश्न पडतो. नाण्यांवर मात्र या राजांचे चेहरे अंकीत केलेले आढळतात. त्यावरून क्षत्रपांच्या नहपान नावाच्या राजाचे शिल्प करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**ब्रिटिश राजवटीत नाण्यांचे स्वरूप बदलले :**

१९३९ मध्ये जॉर्ज सहावा याचे चित्र असलेले नाणे, १९०१ मध्ये राणी व्हिक्टोरियाचे नाणे, ग्रेट ब्रिटनची निरनिराळी चित्रांकित ११ नाणी अशी काही नाणी निघाली. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यानंतर नाणी बदलली, स्वरूप बदलले.

प्राचीन जुन्या नाण्यांचा एकत्रीत साठा बु—हानपुर येथील अमीरगड व महाराष्ट्रातील देवगिरी येथे पाहवयास मिळातो. 'मुद्रा भारती' आणि ' प्रिन्स ऑफ वेल्स ' म्युझियम येथे संयुक्त विद्यमाने, 'कुमार स्वामी हॉल' म्यझियम येथे १९९४ मध्ये नाण्यांचे एक प्रदर्शन भरविण्यात आले होते.त्यात जगभरातील विविध नाणी ठेवण्यात आली होती. त्यातुन इतिहासाकडे बघण्याचा एक नवा दृष्टिकोन मिळाला. या प्रदर्शनात शिवमुद्रा ठेवण्यात आली होती.

महाराष्ट्रात शिवकाळाच्या पूर्वार्धात मराठयांचा राज्यविस्तार कोकण प्रांतात अधिक होता. लारी हे चांदीचे नाणेही चलनात होते. म्हणूनच शिवकाळात सोन्याचा होन चांदीची लारी व तांब्याची शिवराई ही प्रमुख नाणी आढळतात. शिवकाळात स्थानिक सराफ, सोनारांना परवरनर देऊन विशिष्ट वनज व कस असलेली नाणी पाडून घेत.

या नाणी जमा करण्याच्या काही व्यक्तींच्या छंदामुळेच ही माहिती मिळते. मदुराई येथील १४ व्या शतकातील सुलतान अलाऊद्दीन सिकंदर शाह यांचे दुर्मिळ सुवर्ण नाणे ' टंका ' हे संग्राहक बस्तीमल सोळंकी यांना मिळाले. ते ११ ग्रॅम वजनाचे आहे. इ.स.पूर्व १३७२ ते १३७७ या काळातील हे नाणे असून त्याच्या एका बाजूस हिजरी तारीख व दक्षिणी टांकसाळ दौलताबाद असा उल्लेख आहे. तसेच महदी उझ झमान , यमीन उल खिलफत, नासिर मील उल मोमीन अशी विरूदे आहेत. तर नाण्याच्या दुस—या बाजुस अलाऊद्दीन सिकंदर शाह चे नाव आहे. हा सर्व मजकुर अरबी लिपीत आहे. संजय गोडबोले या अभ्यासकांनी या नाण्याचे वाचन केले.

नाणी जमा करण्याच्या अबिद के पान्कि, शांतीलील जग्याणी यांच्या छंदामुळे आपणास बरीच माहिती मिळते.

१) अकबर बादशहा यांनी रामाचे चित्र नाण्यावर काढले. यातून परधर्म सहिष्णूता, परमत सहिष्णूता दिसून येते.

२) पक्षी, प्राणी, फुले , वृक्ष : राज्यकर्त्यांमध्ये असलेली पर्यावरण संरक्षणाविषयीची जाणीव जागृती लक्षात येते.

३) विविध व्यक्तींची चित्रे : यावरून व्यक्तीपुजेला, तिच्या कार्याला प्राधन्या, अलौकीक व्यक्तीमत्वाच्या व्यक्तींचा आदर्श इतरांनी ठेवला पाहिजे हे दिसून येते. म.गांधी , इंदिरा गांधी, योगी अरविंद, वल्लभभाई पटेल, खशहाल बालिका.

**विष्यातील नाण्यांवरील चित्रे :** पुस्तक, पेन, संगणक ,पाण्याचा थेंब, खेळ—क्रिकेट बॅट व बॉल, अब्दुल कलाम, कारखाना, उद्योग प्रधान भारतासंबंधीत चित्रे. त्याकाळात लोकजागृतीसाठी आजच्या सारखी प्रसारमाध्यमे नव्हती. नाण्यावरील चित्र व लेखनातुन लोकजागृती व प्रबोधनाचे कार्य केले जात.

सत्य, कर्तव्य निष्ठा , प्रेम , शांती, बंधुभाव, सहकार्य,त्याग, समानता यांच्या जोपासनेमुळे मानवी जीवनात आनंद निर्माण होऊ शकतो. हा संदेश लोकांमधील बंधुभाव , स्वाभीमान, आत्मविश्वास व आत्मबल सदैव जागृत ठेवते.

**शैक्षणिक उपयोजन :**

आर्थिक विनिमय, व्यापार उद्दीम,सुबत्ता,अवनती,तंत्रज्ञानात्मक प्रगती, राजकिय यंत्रणा, तत्वज्ञान, धार्मिक कल्पना,कलाकुसर इ. कितीतरी पैलुंविषयी ऐतिहासिक नाणी बोलु शकतात. नाण्यांमुळे राजांची नावे,त्यांची क्रमवारी,त्यांचा काळ,राज्यांची स्थाने,त्याच्या सीमा समजण्यास मदत होते. नाण्यांचे वनज,आकार,प्रकार,धातु,नाण्यांवरील मजकूर,चिन्हे,चित्रे,नाण्यांचे दर्शनी मूल्य,त्यांची टांकसाळी या सा—या गोष्टी महत्वाच्या असतात.दुर्मिळ व इतिहासाचे प्रतिनिधित्व करणा—या नाण्यांतून विद्यार्थ्यांचा इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक व्यापक व मनोरंजक होतो.